नियमित दिवाणी दावा क्र.१९१/२०२१ नि.२१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र. १ हे मयत झाल्याने दाव्याच्या कामी मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशिर प्रतिनिधी समाविष्ट करुन घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. वादी यांनी पुढे असे नमूद केले की, यातील प्रतिवादी क्र. १ हे दि. १५.१०.२०२१ रोजी मयत झाले आहेत.

२. त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतरचे ताकीदीसाठी असून सदर प्रतिवादी क्र. १ या दाव्यातील आवश्यक पक्षकार होते. सदर प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशिर प्रतिनिधी यांना दाव्यात समाविष्ट न केल्यास वादीचे दाव्यास बाधा होणार आहे. तरी अर्ज मंजूर करण्यात यावा अशी प्रार्थना त्यांनी केली.

३. प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. या दाव्यातील मयत प्रतिवादी यांचे कायदेशिर प्रतिनिधी हे दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यांना जर दाव्यात समाविष्ट करुन घेतले नाही तर दाव्याचा अंतिम निवाडा करण्यासाठी बाधा येणार आहे. सदर प्रतिवादीचा मृत्यु कोराना कालावधीत झाला आहे. अर्ज मुदतीत आहे. सबब मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशिर प्रतिनिधी दाव्याच्या कामी झालेले अवसान रद्दबातल करुन सदर कायदेशिर प्रतिनीधी यांना दाव्याचे कामी समाविष्ट करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते.

२. वादीने तशी दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत दाव्याची कामी

समाविष्ट करावी. दुरुस्त प्रत दिल्यावर सदर कायदेशिर प्रतिनीधी यांना दाव्याचे समन्स काढण्यात यावे.

३. सहा अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये सदर दुरुस्तीची नोंद करुन घ्यावी.

sdxx

दि. २४.११.२०२१ (वि. द. पाटील)

आटपाडी दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आटपाडी

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 24.11.2021
Order signed by the
Presiding Officer on - 24.11.2021
Order uploaded on - 25.11.2021